माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ५०४/२०२२**

**अपिलार्थी, श्री. लालेंद्र वामनजी कुंभलवार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या. संवसु उपविभाग, तुमसर, ता.तुमसर जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या. संवसु विभाग, भंडारा, ता.जि. भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०४.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १४.१०.२०२१ | ०९.११.२०२१ | ०१.१२.२०२१ | ०४.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १४.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " सन २०१४ ते २०१८ या आर्थिक वर्षात आपल्या विभागाला एकूण शासनाकडून जो निधी प्राप्त झाला व ज्याप्रमाणे तो खर्च झाला त्या अभिलेख्यातील नोंदीचे रेकॉर्ड देण्यात यावे. शासनाच्या निधी मिळणारी योजना, प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक व दिनांक, मंजुर राशी, काम सुरु व पुर्ण दिनांक, खर्च राशी, उर्वरित राशी, कंत्राटदाराचे नाव, अशी उपलब्ध अभिलेखानुसार द्यावी " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९.११.२०२१ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०१.१२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "जोडपत्र-अ नुसार अपेक्षित माहिती न देता अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०४.०१.२०२२ अन्वये, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, उपविभाग तुमसर यांनी उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे सांगितले करीता सदर अपील निकाली काढण्यात येत आहे, असे आदेश पारीत केले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १८.०२.२०२२ रोजी** " प्रथम अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी आदेश पारीत केला "

असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक २४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक २४.०४.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी त्यांचे सविस्तर लेखी निवेदन देखील सादर केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही शपथपत्रावर दाखल करणे अपेक्षित असून त्यांनी स्विकारलेली कार्यपध्दती माहितीचा अधिकार कायद्याशी विसंगत असल्याचा आक्षेप नोंदविला आहे. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाहीची मागणी केलेली आहे. याउलट विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या खुलाश्यात अपिलार्थी श्री. कुंभलवार यांचा दिनांक १४.१०.२०२१ रोजीचा माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०९.११.२०२१ रोजी अपिलार्थीस कार्यालयात उपलब्ध असलेल्या सन २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये संगणक प्रणालीमध्ये नोंद असलेले अभिलेख पुरविण्यात आले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सकारात्मक आदेश देखील पारीत केला आहे. ही बाब लक्षात घेता, सादर केलेला व्दितीय अपील अर्ज तथ्यहिन असून फेटाळण्यात यावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरुन प्रदान करण्यात आलेली माहिती व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेला आदेश तसेच अपिलार्थी यांना जोडपत्र-अ मध्ये अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरुन विनामुल्य माहिती प्राप्त झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, सादर केलेला व्दितीय अपील अर्ज तथ्यहिन असल्यामुळे फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २४.०४.२०२४

जावक क्रमांक EYL10 दिनांक 04 SEP 2024